
# पुणे महानगरपालिका
# सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक



# पुणे- दृष्टीक्षेपातील




भारतातील सर्वा धक लोकसंख्या असलेले आठवे शहर

महाराष्ट्रातील दुसरे सर्वात मोठे शहर

पुणे महानगरपा लका हद्दीतील क्षेत्र (including new merged 11 villages) - 332 Sq. Km

लोकसंख्या (as on 2019 ) – 40 lakh+ (without Floating Population)

झोन - 5, वॉर्डस - 15 आ ण प्रभाग - 41

महा वद्यालये /संस्था - 811 “Oxford of the East”

साक्षरतेची सरासरी – 90 %

घरांची संख्या – 9.10 lakh

झोपडप ्यांची संख्या – 426 (297 Notified)

नदीची लांबी - 44 km (मुळा ,मुठा,मुळा – मुठा)

वाहनांची संख्या (2019) - 38.88 lakh
(2W – 28.57 lakh), (4W – 10.31 lakh)

# भौतिक आणि सामाजिक पायाभूत सुविधा




**पाणीपुरवठा (WTP) - 7 No's**

- पाणीपुरवठा - **1350 MLD**
- पाइपलाइनची लांबी - **2600 Km**

**मल:निसारण (STP) - 10 No's**

- मल:निसारण नेटवर्कची लांबी - **2200Km**
- **Waste Water generation -744 MLD**
- **STP Capacity – 567 MLD**

**घनकचरा व्यवस्थापन (SWM)**

- कचरा निर्मिती - **1952 TPD**
- घरोघरी कचरा गोळा करणे - **100%**
- ओल्या व सुक्या कचऱ्याचे विलगीकरण - **80%**
- **Waste Segregation – 100%**
- कचरा प्रक्रिया - **100%**

**रस्त्यांची लांबी - 1400 Km**

**पथ दिवे - 1.76 lakh**

**मनपा शाळा** (प्राथमिक आणि माध्यमिक) - **310**

पीएमसी हॉस्पिटल / ओपीडी – **71 No's**

**उद्यान – 201No's**

**सायकल मार्गाची एकूण लांबी - 100km**

**Share of Public Transport -12.2 %**

**सार्वजनिक बसेस संख्या** (On Road) **-1500**

**(PMPML -1050, On contract - 450)**

**PMPML Bus terminals /Depots - 10**

# पुणे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक करताना विचारात घेण्यात आलेले सिद्धांत(१/३)

सर्व कामांचा व सेवांचा सर्वसमावेशक वापर करून गतीमान,कार्यक्षम व पारदर्शी प्रशासकीय कामांसाठी व शहरातील प्रत्येक नागरीकांचा विकास, हि धारणा डोळ्यासमोर ठेऊन सेवासुविधा प्रदान करणे हे प्रमुख उद्दिष्ट .

सेवासुविधांसह शहराचा सर्वांगीण विकास करणे व इतर अनुषंगीक विकासात्मक बाबींभर देणे

पुणे शहर शैक्षणिक, आद्योगिक, आय.टी.हब, रोजगार निर्मितीचे शहर तसेच राहण्यायोग्य शहर असल्याने शहराचे आकर्षण सर्व स्तरावर .

# पुणे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक करताना विचारात घेण्यात आलेले सिद्धांत (२/३)

शहराच्या मुलभूत सोयीसुविधा, विकास कामे, लहान-मोठे, अल्प व दीर्घ मुदतीचे प्रकल्प यांचाही प्राधन्यक्रमाने विचार करण्याचे आव्हान प्रशासनावर व राजकीय स्तरावर .

केंद्र व राज्य शासनाच्यावतीने प्रामुख्याने प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत अभियान, आयुष्यमान भारत या महत्वकांक्षी योजनांचा समावेश असल्याने त्यांची अंमलबजावणी करणे.

भूगर्भ पाणीसाठ्यात वाढीच्या उपाययोजना करणे

# पुणे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक करताना विचारात घेण्यात आलेले सिद्धांत (३/३)

शहरातील वाहतुक आणि कचरा  या प्रश्नांसोबतच  अत्यावश्यक व सर्वांना पुरेसे पाणी मिळेल यासाठी दक्षता .


मनपाच्या शिक्षण व आरोग्य विभागांचे प्रमुख प्रश्न आणि त्यावरील उपायांचा आराखडा तयार करून अंमलबजावणी करणे.

पुणे मनपाची आर्थिक स्थिती भक्कम करणे, उत्पन्न वाढविण्यावर भर देणे आणि क्रेडिट रेटिंगमध्ये (AA+) सातत्य ठेवणे .

# पुणे महानगरपालिकेचे महत्वाचे प्रकल्प















# सुनियोजित व समान पाणीपुरवठा

(भांडवली तरतूद र.रु.६५७ कोटी + महसुली तरतूद र.रु.६०४ कोटी = र.रु.१२६१ कोटी)



पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी २४/७ समान पाणीपुरवठा योजने अंतर्गत वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी सुमारे ५०० कि.मी.लांबीची नवीन वितरण व्यवस्था विकसीत करणे आणि अंदाजे १.५ लक्ष जलमापक बसविण्याचे उदिष्ट.

अमृत अभियानांतर्गत संपूर्ण शहरास तंत्रशुद्ध पद्धतीने पाणीपुरवठा करणेसाठी साठवण टाक्या बांधण्याची कामे पूर्ण करणे.

पुणे शहराच्या पूर्व भागातील वडगांवशेरी, खराडी, चंदननगर, विमाननगर, कळस, धानोरी इत्यादी भागाची पाणी समस्या सोडविण्यासाठी भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याची योजना सन २०२०-२१ मध्ये कार्यान्वित करणे.

# राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी प्रदुषण नियंत्रण करणे (जायका प्रकल्प)

(तरतूद र.रु.७५ कोटी)

सदर योजनेमध्ये प्रामुख्याने ११ मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे उभारणे, सुमारे ११३ किमी लांबीच्या मलवाहिन्या विकसीत करणे, जीआयएस/एमआयएस, स्काडा यंत्रणा उभारणे, कम्युनिटी टॉयलेट ब्लॉक उभारणे इ. एकूण १३ पॅकेजेसच्या कामांचा समावेश आहे.



पॅकेज क्र.४,५व ८ मध्ये सहा मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे उभारण्याचा समावेश (एकूण क्षमता २७७ एमएलडी आणि मुख्य मलवाहिन्या ७० कि.मी.लांबी) विकसीत करणे व पॅकेज क्र.२ व ३ मधील कामे सुरु करणे,सदर कामे आगामी ३ वर्षात प्रकल्प पूर्ण करण्यात येणार.

उर्वरित पॅकेजस मधील कामांची निविदा प्रक्रिया करण्यात येऊन कामे सुरु करण्यात येणार असून, सन २०22 अखेर कामे पूर्ण करण्यात येणार.




# मलनि:सारण(१/२)

**(भांडवली तरतूद र.रु.११७ कोटी + महसुली तरतूद र.रु.१८१ कोटी = र.रु.२९८ कोटी)**

नव्याने समाविष्ट ११ गावांमध्ये मास्टर प्लॅन प्रमाणे मुख्य मलवाहिन्या विकसीत करण्यात येणार.

सदर गावांमधील क्षेत्राची विविध ड्रेनेज ड्रीस्ट्रीक्ट (झोन) मध्ये विभागणी करणे

अतिवृष्टीमुळे अंबिल ओढ्यातील गाळ काढणे, मनपाच्या जागांना,रस्त्यांना संरक्षक भिंती बांधण्याचे काम करणे



# मैलापाणी शुद्धीकरण – (२/२)

पुणे शहरात आजमितीस ७४४ दशलक्ष लिटर प्रतिदिन एवढे मैलापाणी निर्माण होते व सध्या STP ची एकूण क्षमता ४७७ MLD इतकी आहे.

ज्या ठिकाणी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रातून काढण्यात येणाऱ्या स्लजवर ५०० KCI CO BALT-60 द्वारे गॅमा  रेडीएशन करण्यात येणारी महाराष्ट्रातील पुणे मनपा पहिली महानगरपालिका ठरणार आहे.

यासाठी 100 MT Sludge Treatment साठी प्रकल्प प्रस्तावित



# नदी पुनरुज्जीवन प्रकल्प

(तरतूद र.रु.१० कोटी)

पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड या भागातून वाहणाऱ्या अंदाजे ४४ कि.मी लांबीच्या मुळा, मुठा व मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या प्रारूप आराखड्याची State level Environmental Assessment Authority यांच्यामार्फत मान्यता मिळालेली आहे.

SPV स्थापन करणेसाठी मे. राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

प्रकल्प उभारणीसाठी फायनान्शीयल मॉडेल व फेज १ चे डिटेल इंजिनिअरींग ड्रॉईंग, एस्टीमेट तयार तयार करणे.



# घनकचरा व्यवस्थापन(१/३ )

(स्वच्छ भारत अभियान २०२०)

(भांडवली तरतूद र.रु.९० कोटी + महसुली तरतूद र.रु. ४९५ कोटी = ५८५कोटी)



स्वच्छ भारत अभियान २०२० अंतर्गत शहरातील एकूण शौचालयांपैकी २५% शौचालये सर्व सुविधांयुक्त बेस्ट टॉयलेट असणे आवश्यक त्याअंतर्गत ३१० शौचालये निश्चित केलेली असून यामध्ये प्रामुख्याने सॅनिटरी वेंडिंग मशीन, एक्झॉस्ट फॅन, वॉश बेसिन सोय, नॅपकीन या सुविधांनी युक्त करण्यात आली आहेत.



नागरिकांनी ओला व सुका कचरा स्वतंत्र करून देण्यासाठी सहभाग वाढविणे व वस्तीपातळीवर विविध प्रकारे सातत्याने जनजागृती करणे



# घनकचरा व्यवस्थापन(२/३)

पुणे शहरातील रामटेकडी हडपसर येथील ७५० मे.टन प्रकल्पांतर्गत वीज निर्मिती करण्याचे उद्दिष्ट



उरुळी फुरसुंगी डेपो येथे १००० मे टन क्षमतेचा बायोमांयनिंग प्रकल्प उभारणे



पुणे शहरातील उपनगरात निर्माण होणारा कचरा त्याच भागात यांत्रिकी पद्धतीने वर्गीकरण करून जिरविण्याचे उद्दिष्ट



# घनकचरा व्यवस्थापन(३/३)

भूगांव व बावधन याठिकाणी यांत्रिकीकरण करून आधुनिक रॅम्प करणे व १०० मे टन मिश्र कचऱ्यावरील प्रकल्प प्रस्तावित



हडपसर - रामटेकडी येथील पुणे बायो एनर्जी प्रकल्पाकरिता २ एम.एल.डी चा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे व प्रक्रिया केलेले पाणी बायो एनर्जी या प्रकल्पास उपलब्ध करून देणे



शहरातील सार्वजनिक शौचालय व वस्ती पातळीवरील शौचालयाची स्वच्छता आऊटसोर्सिंग तत्वावर करण्यात येणार आहे.




सफाई कर अंतर्गत वापरकर्ता शुल्क प्रस्तावित

# आरोग्य विभाग

(महसुली तरतूद र.रु. ३२६ कोटी)

स्व.भारतरत्न राजीव गांधी रुग्णालय येथे एम.आर.आय.प्रकल्प खाजगी वैद्यकीय संस्था/चॅरीटेबल ट्रस्ट/स्वयंसेवी संस्था यांचेमार्फत करण्यात येत आहे.



जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने कोंढवा येथील शेळी व मेंढी यांच्या कत्तलखान्याचे आधुनिकीकरण PPP तत्वावर करणे.



पुणे महापालिकेचे प्रस्तावित अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय स्थापित करण्याच्या कामाला गती देणे



भटक्या व मोकाट कुत्र्यांची मोठ्या प्रमाणात नसबंदी शस्त्रक्रिया होण्याच्या दृष्टीने नायडू डॉग पॉडचे आधुनिकीकरण करणे

# नगर नियोजन

पुणे महानगरपालिका मुळ हद्द व समाविष्ट २३ गावे या ठिकाणी नविन टी.पी.स्कीम राबविण्याचा प्रस्ताव आहे.

अमृत योजने अंतर्गत प्रायोगिक तत्वावर फुरसुंगी व देवाची ऊरुळी या दोन गावांमध्ये टी.पी.स्कीम करणे

त्या ठिकाणच्या सोयीसुविधांसाठी आवश्यक जागा, अंतर्गत रस्ते महानगरपालिकेच्या ताब्यात येऊन ह्या भागाचा सुनियोजित विकास करणे


११ गावांचा प्रारूप विकास आराखडा तयार करून नागरीकांच्या हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात येणार

Town Planning Schemes





११ गावांचा प्रारूप  वकास



# प्रधानमंत्री आवास योजना

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मंजूर प्रकल्पांपैकी प्रथमतः खराडी येथे प्रत्यक्ष जागेवर ७६८ सदनिकांचे कामकाज सुरु करण्यात आले आहे.



तसेच वडगाव खुर्द ११०८ व हडपसर येथे ३४० सदनिकांच्या बांधकामांचे व सदनिकांचे सोडतीचे नियोजन

सार्वजनिक - खाजगी तत्वावर खाजगी विकसकांमार्फत साधारण १०,००० घरकुलांची निर्मिती करण्याचे नियोजन



सन २०२०-२१ या वर्षात मौजे कोंढवा (बु), बालेवाडी,बाणेर व धानोरी येथील जागा प्रकल्पांसाठी उपलब्ध होणार असून त्या जागांवरील सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे नियोजन

खाजगी विकासकाच्या माध्यमातून सुमारे ५००० घरांना केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे. त्यामध्ये मौजे लोहगाव येथे गृहप्रकल्पाचे काम सुरु झाले आहे व मौजे धानोरी व महंम्मदवाडी येथील प्रकल्पांस पर्यावरण विभागाची मान्यता मिळणेकामी सादर झाले आहेत.



# वाहतूक नियोजन व प्रकल्प (१ /३)

(भांडवली तरतूद र.रु. १८६ कोटी + महसुली तरतूद र.रु.१९ कोटी = २०५ कोटी)

राष्ट्रीय राजमार्ग क्रमांक ४ वरील चांदणी चौकातील रस्त्यांचे एकात्मिक विकसनाबाबत आराखड्यानुसार लाईट, पाणी, ड्रेनेज इत्यादी सुविधांसह सर्व कामे NHAI मार्फत करणेत येणार आहे.



विश्रांतवाडी येथे पुणे मनपा व राष्ट्रीय महामार्ग योजने अंतर्गत संयुक्तपणे उड्डाणपुल उभारण्यात येणार आहे.



मुंबई- बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वर पाषाण-सुस व सिंहगड रोड आणि करिष्मा चौक ते कर्वे पुतळा येथे वाहतुकीचा ताण कमी करणेसाठी उड्डाणपुल बांधणे



# वाहतूक नियोजन व प्रकल्प (२/३)

खराडी बायपास चौक येथे उड्डाणपुल/ग्रेड सेपरेटर बांधणे

बोपोडी चौक, पुणे मुंबई रस्ता येथे वाहन भुयारी मार्ग व पादचारी मार्ग बांधणे

राजाराम पूल येथे बंडगार्डन आर्ट प्लाझाच्या धर्तीवर पेडेस्ट्रीयन प्लाझा विकसीत करून सुशोभीकरण करणे

सनसिटी,सिंहगड रोड ते कर्वे नगर नदीवर व बालेवाडी स.नं.४६/४७ जवळ मुठा नदीवर पूल बांधणे







# वाहतूक नियोजन व प्रकल्प (३/३ )

पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ विकसीत करणे

पी.पी.पी./बी.ओ.टी/डेव्हलपमेंट टी.डी.आर इत्यादी माध्यमातून बंडगार्डन जंक्शन ते मुंढवा पुलापर्यंत मान्य विकासआराखड्यात दर्शविलेल्या नदीकाठच्या दक्षिणेकडील ३० मी.उन्नत डी.पी.रस्त्यांच्या कामांचा डीपीआर तयार करणे, रस्ता विकसीत करणे व तदनुषंगिक कामे (पूल) करणे

पुणे शहरातील दहा उड्डाणपुलांखाली (बीओटी/सौजन्य) सुशोभीकरण करणे







# पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प

वनाझ ते रामवाडी या मेट्रो मार्गिकेचे काम प्रगतीपथावर असताना वनाझ ते चांदणी चौक (शिवसृष्टी)पर्यंतच्या वाहतुकीचा प्रश्न सोडविणेकरीता, मेट्रो मार्ग विस्तारीत करण्याचे व डीपीआर तयार करण्याचे काम महामेट्रोमार्फत सुरु










# पथ विभाग (१/२)

(भांडवली तरतूद र.रु.४६२ कोटी + महसुली तरतूद र.रु.२०२ कोटी = ६६४ कोटी)



HCMTR Route Map

**<u>उच्च क्षमता द्रुतगती मार्ग प्रकल्प (हाय कपॅसिटी मास ट्रान्झीट रूट -HCMTR)</u>**

महाराष्ट्र शासनाने “**महत्वपूर्ण पायाभूत प्रकल्प**” म्हणून मान्यता दिलेली आहे.

एच.सी.एम.टी.आर.प्रकल्पाची एकूण लांबी सुमारे ३६ कि.मी. प्रस्तावित आहे. यामध्ये २ मार्गिका खाजगी वाहनांसाठी आरक्षित आहेत.

याप्रकल्पासाठी ११ गावांची संयुक्त मोजणी व मालकी हक्क विषयाची कारवाई पूर्ण करण्यात आली आहे.

येत्या काळात सदर प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी विविध वित्तीय पर्याय देऊन प्रकल्प खर्च उभारण्याची कार्यवाही सुरु

# पथ विभाग (२/२)

रोड/बेस स्टॅबिलायझेशन तंत्रज्ञान वापरून रस्त्यांचे नाविण्यपूर्ण काम करणे

ब्रेमेन चौक, औंध नजीक ४००मी X १८ मी या क्षेत्रामध्ये लहान मुलांसाठी (Children Traffic Plaza) वाहतूकविषयक माहिती देणारा पार्क उभारणेचे पूर्ण करणे

मुठा नदीच्या दोन्ही काठाने इलेव्हेटेड आर.सी.सी.रस्ता डिफर्ड पेमेंट पद्धतीने बांधणे व कार्यान्वित करणे.






३D थर्मोप्लास्टीक पेंट, झेब्रा पट्टे बी.एम.सी.सी.येथे प्रायोगिक तत्वावर करण्यात येणार असून यावर्षात २५ चौकात काम करण्याचा मानस आहे.





HCMTR Route Map



# बी.आर.टी.एस. (BRTS)

गणेशखिंड रस्ता आणि  पाटील इस्टेट जंक्शन ते हॅरिस ब्रीज बोपोडी (पुणे -मुंबई रस्ता)  या कामामध्ये एकूण १५ कि.मी.लांबीचे बी.आर.टी.एस.मार्ग पूर्ण करण्यातचे नियोजन

सातारा रस्ता - स्वारगेट जंक्शन ते कात्रज दरम्यान सुमारे ५.५० कि.मी.लांबीकरीता बी.आर.टी.एस.योजनेचे काम या वित्तीय वर्षात पूर्ण करणे








# शहरी एकात्मिक सायकल योजना

पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सायकल क्लब स्थापन केला असून आजमितीस १९५० सभासद असून यामध्ये मनपा अधिकारी,कर्मचारी आजी/माजी पदाधिकारी, स्वयंसेवी संस्था, नागरीक यांचा समावेश आहे.

सायकल क्लबच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविणारी पुणे महानगरपालिका ही भारतातील पहिली स्थानिक स्वराज्य संस्था



# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.(PMPML) (तरतूद र.रु.३४६ कोटी)

पी.एम.पी.एम.एल.मार्फत नवीन ई –बसेस जीसीसी मॉडेल (Gross Cost Contract) तत्वावर व दरवर्षी २०० सी.एन.जी बसेस खरेदी करण्यातचा मानस व त्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारणे

पी.एम.पी.एम.एल.च्या विविध डेपोमध्ये विकसनाची कामे करणे









# उद्यान विभाग

भांडवली तरतूद र.रु ५७ कोटी+महसुली तरतूद र.रु.४९ कोटी एकूण र.रु.१०६ कोटी )

स्व. राजीव गांधी संग्रहालय येथे मास्टर प्लॅन मधील दुसऱ्या टप्प्यातील विविध वन्य प्राण्यांच्या खंदकांची कामे करणे तसेच इंटरप्रिटेशन सेंटर ची कामे, ऑडीटोरीयम इ. कामे करण्याचे प्रस्तावित आहे.



स.नं. ५५, वडगाव शेरी येथे “Barrier Free Access” या संकल्पनेवर आधारीत दिव्यांगाकरीता अडथळा विरहीत उद्यानाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन



स.नं २२७ लोहगाव, विमाननगर येथे बालकांकरीता (Toddlers) वैशिष्ट्यपुर्ण उद्यान विकसित करण्याचे काम सुरु

कै. बाळासाहेब ठाकरे उद्यान, डहाणुकर कॉलनी, कोथरूड येथे सुशोभिकरण करणेचे काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.



# विद्युत विभाग

भांडवली तरतूद र.रु २९ कोटी+महसुली तरतूद र.रु.१०७ कोटी एकूण र.रु.१३६ कोटी)

पुणे शहरातील नदीवरील पुलांवर आर्किटेक्चरल प्रकाश व्यवस्था करणे व सुशोभिकरण करणे



पुणे महानगरपालिका व क्षेत्रिय कार्यालये  या ठिकाणी ई-चार्जिंग स्टेशनची उभारणी करणे







# भवन रचना

भांडवली तरतूद र.रु .१९४ कोटी+महसुली तरतूद र.रु.३८ कोटी एकूण र.रु.२३२ कोटी)

कोथरूड येथे शिवसृष्टी उभारणेत येणार आहे.



घोले रोड येथे नगर वाचनालय (सिटी लायब्ररी) बांधण्याचे नियोजन आहे

कोथरूड यथे एक्झिबिशन सेंटरची उभारणी करणे




बालगंधर्व रंगमंदिराचे पुनर्निर्माण करणेत येणार आहे

बाणेर स. नं.११४+११५ येथे नोकरी करणाऱ्या महिलांसाठी हॉस्टेल बांधणेत येणार आहे व स.नं.८–८ येथे आदिवासी/मागासवर्गीय विद्यार्थिनी, महिलांकरीता निवासी प्रशिक्षण केंद्र बांधणे.

FUTURE PROPOSED PROJECTS



# माहिती व तंत्रज्ञान (तरतूद र.रु. ३३ कोटी)

नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांच्या नकाशांची भौगोलिक माहिती Enterprise GIS मार्फत उपलब्ध करण्यात येणार आहे.

विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या ऑनलाईन संगणक प्रणालींच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व प्रणालींचे सिक्युरिटी ऑडीट करणे .

# हेरीटेज सेल

नानावाडा येथे आद्य सशस्त्र क्रांतीकारक यांचे जीवनचरित्रावर आधारित म्युझियमच्या फेज-२ काम करणे



सिंहगड किल्ल्यावरील नरवीर तानाजी मालुसरे समाधीस्थळ भोवतालच्या परिसरात पर्यटकांच्या सोयीसुविधा पुरविणे

वारसा संवर्धन आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी हेरीटेज वॉक, मिनी बस टूर हे उपक्रम सुरु करण्यात येतील



# प्राथमिक, माध्यमिक व तांत्रिक शिक्षणासाठी आधुनिक सुविधा

**(प्राथमिक र.रु ३४५ कोटी, माध्यमिक व तांत्रिक र.रु.७३ कोटी )**

मॉडेल ऑर्फ एक्सलंस स्कूल – या उपक्रमांतर्गत १० शाळांमध्ये रोबोटिक लॅब, म्युझिक रूम मार्फत विद्यार्थी गुणवत्तावाढीसाठी व शिक्षकांची अध्यापन पद्धतीमधील क्षमता वाढ करण्याचे नियोजन

विशेष मुलांची शाळा – पुणे महापालिकेच्या विशेष मुलांसाठी वाहतुकीची सुविधा पुरविण्यात येत आहे.

माध्यमिक शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्य शासनाच्या उद्दिष्टांनुसार Model ITI प्रमाणे पुणे महानगरपालिका संचलित श्री.छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) चे अद्ययावतीकरण करणे







# समाज विकास विभाग

खादी ग्रामोद्योग आयोगाच्या नोडल एजन्सी असणाऱ्या राष्ट्रीय कुंभारी प्रशिक्षण संस्थेबरोबर स्वयंरोजगार कार्यक्रम राबविणे.



पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने सीएसआर अंतर्गत वंचित तरुणांना सक्षम बनविण्यासाठी शाश्वत उपजीविकेचे साधन म्हणून जनता वसाहत व अन्य ठिकाणी नवीन लाईट हाऊस प्रकल्प सुरु करणे



सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी Safety Mapping व Safety Audit करणे.

# मागील चार वर्षाचा अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा

# मागील ४ वर्षांचा संक्षिप्त आढावा : जमा बाजू

(आकडे रुपये कोटीत )

| जमा बाजू | डिसेंबर २०१६ अखेर | डिसेंबर २०१७ अखेर | डिसेंबर २०१८ अखेर | डिसेंबर २०१९ अखेर |
|---|---|---|---|---|
| स्थानिक संस्था कर | १०५१.७४ | ६३५.६६ | ७३.४३ | १२४.१७ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | ०.०० | ८२३.८० | ११७९.५४ | १२७६.९२ |
| मिळकत कर | ८९८.६० | ६०७.४७ | ७५०.४१ | ८२६.६१ |
| पाणीपट्टी | ३५.४९ | १४९.५६ | १९७.४३ | १९७.४९ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ४०२.०५ | ३२९.१२ | ५५९.८७ | ५८८.९७ |
| इतर जमा | २१७.८७ | २९८.३६ | १९४.४७ | २०५.९९ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ०.०० | ३९.९० | ०.३० | ०.०० |
| शासकीय अनुदान | १२.४१ | ७९.३९ | ९९.०२ | १२२.३६ |
| कर्ज रोखे | ०.०० | २००.०० | - | - |
| प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) | - | - | ०.०३ | - |
| एकूण रक्कम रु. | २६१८.७४ | ३१६३.१६ | ३०५४.५० | ३३४२.५१ |

# मागील ४ वर्षांचा संक्षिप्त आढावा : खर्च बाजू

(आकडे रुपये कोटीत )

| खर्च बाजू | डिसेंबर २०१६ अखेर | डिसेंबर २०१७ अखेर | डिसेंबर २०१८ अखेर | डिसेंबर २०१९ अखेर |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | ७४३.२२ | ११६३.२७ | १०८१.०५ | ११२६.६८ |
| प्राथमिक शिक्षण | १०७.६४ | ० | ० | ० |
| वीज खर्च व दुरुस्ती | १११.०६ | १४३.५१ | १४९.८६ | १६९.७० |
| पाणी खर्च | ७.५७ | १३.९८ | ५६.९४ | ५१.३७ |
| कर्ज परतफेड, व्याज व घसारा | ३५.५१ | १२.७१ | २१.०६ | २९.६१ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | ६९.७० | ६०.३५ | ७४.४२ | १०१.८१ |
| देखभाल दुरुस्ती व इतरखर्च | २८७.१३ | ३०९.३५ | ३७६.६५ | ४१५.६२ |
| वार्डस्तरीय कामे | ४.४२ | १.३३ | ४.४२ | ३.६० |
| क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | १८.४३ | ०.४० | ५.८६ | १२.७० |
| भांडवली व विकासाची कामे | ४९८.३५ | ५३२.२३ | ४३५.०१ | ५३७.८३ |
| स्मार्ट सिटी व अमृत योजना | ५१.८४ | ६५.०३ | ३२.९१ | १५.६६ |
| **एकूण रक्कम रुपये** | **१९३४.८७** | **२३०२.१६** | **२२३८.१८** | **२४६४.५८** |

# सन २०२०-२१ चे वार्षिक अंदाज पत्रक


# सन २०२०-२१ आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे


(आकडे रुपये कोटीत )

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| वर्षारंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | १८६०.५० |
| स्थनिक संस्था कर | २३९.१५ | वीज खर्च व दुरुस्ती | २९२.९६ |
| वस्तू आणि सेवा कर(GST) | १८३८.७६ | पाणी खर्च | १००.३५ |
| मिळकतकर | १९७०.२० | कर्ज परत फेड, व्याज | ७५.१८ |
| बांधकाम परवानगी व शहर विकास चार्जेस | ७४९.२५ | औषधे, पेट्रोल/ डिझेल खर्च | १५१.३० |
| पाणी पट्टी | ४६३.०० | देखभाल दुरुस्ती / इतर खर्च | ११३४.२२ |
| शासकीय अनुदान | १९४.०४ | वॉर्डस्तरीय कामे | ३४.८० |
| इतर जमा | ४९१.९६ | क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची कामे | ८३.६७ |
| कर्ज /कर्ज रोखे | २००.०० | भांडवली व विकासाची कामे | २४९६.०० |
| प्रधानमंत्री आवास योजना | ८२.६२ | वर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| एकूण | ६२२९.०० | एकूण | ६२२९.०० |

# रुपया असा येणार - सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक (र.रु ६२२९ कोटी)



# रुपया असा जाणार - सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक (र.रु ६२२९ कोटी)



# पुरस्कार / यश (१/२ )

**स्मार्ट सिटीज डिजिटल पेमेंट्स अवॉर्ड्स'** - भारत सरकारच्या शहरी आवास मंत्रालयने ७२ स्मार्ट सिटीमध्ये पुणे शहराला दि.२६ फेब्रुवारी, २०१९ रोजी नवी दिल्ली येथे 10 लाख पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांच्या श्रेणीमध्ये, डिजिटल पेमेंट्स अवॉर्ड मध्ये, पुणेशहराने **'बेस्ट डिजिटल पेमेंट्स अँडॉप्टर'** पुरस्कार जिंकला आहे.




**Wellbeing City Award** - पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने सीएसआर अंतर्गत वंचित तरुणांना सक्षम बनविण्यासाठी शाश्वत उपजीविकेचे साधन म्हणून पुणे शहरात लाईट हाउस प्रकल्पासाठी **शहराला अर्थव्यवस्था आणि संधी क्षेत्रातील** मॉन्ट्रीअल शहर, कॅनाडा व नोवार्टिस यूएस फाउंडेशन यांच्यासमवेत न्यूसिटीज् या संस्थेने वेलबीईंग सिटी वार्ड २०१९ विजेता म्हणून प्राप्त झाला आहे. वेलबीईंग सिटी वार्ड हा जागतिक पातळीवरील पहिला पुरस्कार असून तो शहराद्वारे नागरी कल्याणासाठी केल्या जाणाऱ्या कार्यक्रमाची ओळख करून देतो.



# पुरस्कार / यश (२/२ )

**शाश्वत परिवहन पुरस्कार २०२० -** रस्ते, पादचारी पायाभूत सुविधा सुधारणांमधील प्रादेशिक नेतृत्व आणि बीआरटी सिस्टम ग्रोथ मधील पुणे शहरातील प्रतिष्ठित शाश्वत परिवहन पुरस्कार २०२० जिंकला आहे. विशेषत: सर्व टिकाऊ वाहतुकीच्या पद्धतींसाठी वेगवान वचनबद्धतेमुळे पुण्याने हा पुरस्कार जिंकला आहे. पादचारी पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण वाढ. ज्यामध्ये रस्त्याचे डिझाईन फक्त कारसाठी न वापरता पादचारी, सायकलस्वार, वाहनचालक आणि सुरक्षित प्रवेशासह ट्रान्झिट चालक या सर्व वापरकर्त्यांसाठी केले आहे.




**स्कोच ऑर्डर ऑफ मेरिट-** Urban95 Programme अंतर्गत पाच वर्षाच्याआतील बालकांचे जीवनमान सुधारण्यासाठी शहरातील नियोजन आणि व्यवस्थापनातील बाल विकास यासाठी पुणे अर्बन initiative हा उपक्रमासाठी स्कोच ऑर्डर ऑफ मेरिट प्राप्त झाला आहे.



PMC wins laurels at SKOCH awards

हे अंदाजपत्रक सादर करताना

आपणा सर्वांकडून

मिळालेल्या बहुमोल

सहकार्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार